!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४६३ २२-२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# जागतिक महिलादिनानिमित्त मातोश्री महिला बचतगट महासंघाची तर्फे बचतगटांनी तयार केलेल्या वस्तुंचे विक्री प्रदर्शन

**संभाजीनगर (ता. २६)** महिलांचे आर्थिक व मानसिक सबलीकरण करण्यासाठी रश्मी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली कैवल्य महिला बचत गट व वाघिनी महिला बचत गट यांच्या सहकार्याने शिवसेना संभाजीनगरच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंची विक्री प्रदर्शनाचे आयोजन ६ ते ८ मार्च सकाळी १० ते रात्री १० दरम्यान गजानन महाराज मंदिराशेजारच्या कडा कार्यालयाच्या मैदानावर करण्यात आले आहे.

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने शिवसेना पक्षप्रमुख उध्दवजी ठाकरे यांच्या प्रेरणेतुन रश्मी ठाकरे यांनी मातोश्री महिला बचतगट महासंघाची स्थापना केली. बचत गटांनी बनविलेल्या गृहउपयोगी वस्तु व खाद्यपदार्थांची विक्री करण्यासाठी या महासंघाला संलग्न असलेल्या बचतगटांनी एकत्र येऊन बचत गटांना वस्तुंच्या विक्रीतुन आर्थिक उत्पन्न प्राप्त व्हावे यासाठी प्रथमच अशा प्रकारचे आयोजन शिवसेना संभाजीनगरच्यावतीने करण्यात आले आहे. महिला दिनाचे औचित्य साधुन ६ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता मातोश्रीगाथा या अमिता कुरवाळे यांचा मातृभक्ती गितांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिलांच्या सुप्तकलागुणांना वाव देण्यासाठी ६ मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. व ८ मार्च रोजी आप्ततकालीन वेळेत काळजी घेण्याची प्रात्याक्षिकांचे सादरीकरण नंदकुमार मांडवकर करणार आहेत. या सर्व कार्यक्रमांच्या महिलांनी लाभ घ्यावा व मोठा संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना संभाजीनगरच्यावतीने करण्यात आले आहे.

बचतगटांना वस्तुविक्रीसाठी स्टॉल बुकिंग करण्यासाठी १ मार्च पर्यंत मातोश्री महिला बचतगट महासंघ जिल्हा कार्यकारिणी अध्यक्ष रंजना कुलर्णी–७६२०९०२०२०, मुक्ता खैरे, अंजली मांडवकर – ९३२६२०५६८४, नलिनी बाहेती – ९७६६४२६१८९, अॅड. प्रज्ञा कारेगावकर – ८८५७००९९९५, मंजुषा नागरे – ९६३७०६३४४३ मिना बेलसरे, रश्मी ढापरे, दुर्गा भाटी यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पालकमंत्री रामदास कदम, शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे, संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, आमदार संजय शिरसाट, सहसंपर्क अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, प्र. जिल्हाप्रमुख सुहास दाशरथे, नरेंद्र त्रिवेदी, महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल, महापौर त्र्यंबक तुपे, महिला आघाडीच्या विशाखा राऊत, मिना कांबळी, वैजयंती खैरे, माजी महापौर अनिता घोडेले, कला ओझा, विजया शिरसाट यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे.

प्रसिध्दी प्रमुख

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525